# तंत्रर शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 30233443, 22690601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
तार - EDUTECH E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dte.org.in

क्रमांक :- 2/एनजीसी/प्रवेशक्षमता वाढ-घट/2013/२२
दिनांक : 03 JAN 2013

प्रति
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय:- शैक्षणिक वर्ष 2013-14 पासून सध्या सुरु असलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्याच्या प्रस्तावाबाबत...........

संदर्भ :- क्र. 2/एनजीसी/प्रवेश क्षमता/वाढ/घट/2012/20093, दिनांक 18 डिसेंबर, 2012

उपरोक्त विषयाचे या संचालनालयाचे संदर्भीन पत्र कृपया पहावे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन 2013-14 या शैक्षणिक वर्षाकरीता प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेस अनुसरून राज्यातील पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविकोत्तर / पदव्युत्तर पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात संबंधित संस्थांनी प्रवेश क्षमतेत वाढ - घट, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, अभ्यासक्रम बंद करणे, संस्था बंद करणे, पीआयओ / एनआरआय साठी जागा, डयुअल / इंटीग्रेटेड प्रोग्राम व परदेश संस्था तथा विद्यापीठाशी संलग्नता याबाबतची माहिती या संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि. 15 जानेवारी, 2013 पर्यंत ऑन-लाईन माहिती भरण्याकरीता यापुर्वी सुचीत केलेले आहे. या संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध झालेल्या अर्जांची तपासणी करुन त्यावर शासनाचे अभिप्राय परिषदेस विहित कालमर्यादेत सादर करणे आवश्यक आहे. म्हणून संचालनालयाने उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवर संबंधित संस्थांच्या अर्जांची निश्चित [Confirm] केलेल्या दिनांकानुसार त्यांच्या प्रस्ताव तथा अर्जाची तपासणी करण्याकरीता खालील प्रमाणे सुनावणीचे वेळापत्रक निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र | संबंधित संस्थांनी संचालनालयाच्या संकेतस्थळी अर्ज निश्चित (confirm) केल्याचा कालावधी | सुनावणीचा दिनांक |
|---|---|---|
| 1 | दि. 06.12.2012 ते दि. 05.01.2013 पर्यंत | दि. 08.01.2013 |
| 2 | दि. 06.01.2013 ते दि. 12.01.2013 पर्यंत | दि. 15.01.2013 |
| 3 | दि. 13.01.2013 ते दि. 15.01.2013 पर्यंत | दि. 17.01.2013 |

उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्रमांक 2 मध्ये नमूद केलेल्या कालावधी संचालनालयाच्या संकेतस्ळावर अर्जाची निश्चित (Confirm) केलेल्या संस्थाची सुनावणी स्तंभ क्रमांक 3 मध्ये नमूद केलेल्या दिनांकास सकाळी 11.30 वाजता संचालनालयाच्या समिती सभागृहात घेण्यात येणार आहे. संबंधित संस्थांनी सुनावणीस उपस्थित राहतांना परिषदेस सादर केलेला प्रस्ताव व खालील कागदपत्रांचा एक स्वतंत्र संच सादर करण्यात यावा.

1. विहित नोंदणी शुल्क भरल्याची पावती
2. प्राचार्य / संचालक नियुक्तीस संबंधित विद्यापीठाच्या मान्यता / शैक्षणिक अर्हतची कागदपत्रे
3. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा अद्ययावत [latest] डेफिसिअन्सी रिपोर्ट (प्राचार्यांनी प्रमाणित केलेला)
4. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा परिषदेस सादर केलेला (पार्ट - I व पार्ट - II ) अर्ज
5. संस्था प्रमुखांनी प्रमाणित केलेले ॲनेक्चर - सी व डी (प्रपत्र).
6. सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेल्या जागा / बांधकाम / इमारतीचे नकाशे, ऑक्युपेन्सी प्रमाणपत्र इ.

तरी, आपल्या कार्यकक्षेतील संस्थांना संदर्भीन पत्रातील सुचना व वरील प्रमाणे कार्यवाही करुन सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रासहीत उपस्थित राहण्यास आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे. तसेच दिलेल्या वेळापत्रकानुसार ज्या संस्था सुनावणीस उपस्थित राहतील त्यांचेच अर्जाबाबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडे शासनाचे अभिप्राय सादर करण्यात येतील याची जाणीव त्यांना करून द्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत, सिस्टिम मॅनेजर / ॲडमिनिस्ट्रेटर, कार्यासन क्रमांक 3, संगणक कक्ष, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

---

**अतितात्काळ**

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तंशिस/प्राकाना/शैवि–३/२०१३/ 35
दि. 3/01/२०१३

प्रति,

सर्व प्राचार्य,
पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर